सहपत्र - १

# विषयपत्रिका : ४३ शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक

## शुक्रवार दिनांक १३ मार्च २०१५

## सकाळी : ११.३०

## वाणिज्य विद्याशाखा सभागृह, शैक्षणिक इमारत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२२२२

## बैठक इतिवृत्त

| विषय – विषय पत्रिकेतून कॉपी करावेत | तपशील |
|---|---|
| ४३.१.० | स्वागतः प्र.संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| ४३.२.० | ४२ व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे ( दिनांक २२ ऑगस्ट २०१४) इतिवृत्त व कार्यवृत्त मान्यतेसाठी सादर |
| ४३.३.० | सखोल चर्चेस विषय. |
| ४३.३.१ | एम.फिल. शारिरीक शिक्षणक्रम बंद करणेबाबत... |
| ४३.३.२ | बी.एड. आणि बालसंगोपन उर्दू भाषेत सुरु करणेबाबत... |
| ४३.३.३ | बी.एड.संदर्भात – |
| ४३.३.४ | विशेष बी.एड.संदर्भात |
| ४३.३.५ | बी.एड.(ई शिक्षण P – ३६) शिक्षणक्रमाबाबत. |
| ४३.३.६ | शालेय व्यवस्थापन पदविकेबाबत. |
| ४३.३.७ | बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम प्रमाणपत्र शिक्षणक्रमाबाबत (सहपत्र – ११) |
| ४३.३.८ | प्रगत अध्यापन शास्त्रातील पदव्युत्तर पदविका शिक्षणक्रम बंद करणेबाबत..... |
| ४३.३.९ | शिक्षणशास्त्र निष्णात एम.एड.शिक्षणक्रमाबाबत<br>१) स्थगिती.<br>२) मूल्यमापन मान्यता. |
| ४३.३.१० | एम.ए.शिक्षणशास्त्र सत्र पध्दतीने सुरु करणेबाबत |
| ४३.३.११ | सामाजिकशास्त्र संशोधन प्रमाणाशिक्षणक्रमाबाबत पत्र. |
| ४३.३.१२ | घरकामगार कल्याण पदविका अंतिम संयुक्त मौखिक परीक्षा-परीक्षक यादी |
| ४३.३.१३ | एस.एच.जी.आणि बालशिक्षण केंद्र बंद करणेबाबत. |
| ४३.३.१४ | मा.अध्यक्षांच्या परवानगीने प्राप्त ऐनवेळचे विषय. |
| | अभिनंदनाचे ठराव. |

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची ४३ वी बैठक दिनांक १३ मार्च २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता वाणिज्य विद्याशाखा सभाग्रह.

शैक्षणिक इमारत, य.च.म.मु.वि.नाशिक येथे आयोजित करण्यात आली. त्या बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

१) डॉ.संजीवनी महाले, प्र.संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
२) डॉ.वाय.एस.राव, प्राचार्य, निवृत्त जळगांव बी.एड.कॉलेज.
३) डॉ.संजीवनी मुळे, प्राचार्य, अंबेजोगाई बी.एड.कॉलेज.
४) डॉ.भूषण कर्डीले, प्राचार्य के.के.वाघ बी.एड.कॉलेज.
५) डॉ.मनोज किल्लेदार, संचालक, सायन्स आणि तंत्रविज्ञान विद्याशाखा.
६) डॉ.प्रकाश देशमुख, प्र.संचालक, वाणिज्य विद्याशाखा.
७) डॉ.सुरेंद्र पाटोळे, वाणिज्य विद्याशाखा.
८) डॉ.माधुरी सोनवणे, कृषी विद्याशाखा.
९) डॉ.सज्जन थुल, परिक्षा विभाग.
१०) प्रा.विजया पाटील, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
११) प्रा.विजयकुमार पाईकराव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
१२) प्रा.माधवी धारणकर, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
१३) प्रा.पवार डी.डी. शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
१४) प्रा.सोनुणे एस.एस. शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
१५) डॉ.कविता साळुंके सचिव शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद.

सदर बैठकीस पुढील सदस्य अनुपस्थित होते.

१) डॉ.चंद्रशेखर चितळे (पुणे)
२) डॉ.नलिनी पाटील (पुणे)
३) डॉ.रेखा टोपकर (सांगली)

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद नवनियुक्त सदस्यांची प्रथम बैठक असल्याने प्रथमतः उपस्थितांचा परस्पर परिचय करण्यात आला. सर्वाचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर कोरम पूर्ण झाल्याची खात्री करुन प्रत्यक्ष बैठकीस सुरुवात झाली.

या बैठकीत पुढील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. त्यातील विषय क्र.४३.३.३, ४३.३.३.९, ४३.३११, ४३.३.१४. ची विद्वत परिषदेकडून मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली.

**४३.२ विषय क्रमांक बी – १ /एफ – १७५ / २०१५/ ०१ ,०२**

दि. २२ ऑगस्ट २०१४ रोजी झालेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त आणि कार्यवृत्तास मान्यता देण्यात आली.

**४३.३ सखोल चर्चेचे विषय.**

**४३.३.१ विषय क्र बी – १ /एफ – १७५/ २०१५ /०१.**

**एम. फिल. शारीरिक शिक्षण शिक्षणक्रम बंद करणेबाबत...**

**टिपणी** : २००९ मधे यु.जी.सी.मार्फत प्रसिध्द झालेल्या परित्रकानुसार एफ.फिल.शारिरीक शिक्षणक्रमाचे नविन प्रवेश स्थगित करण्यात आले होते. शिक्षणशास्त्र विद्याशाखेत शारिरीक शिक्षणातील तज्ज्ञ नसल्याने सदर शिक्षणक्रम सध्या स्थगित ठेवण्याचा विचार आहे. चर्चेसाठी सादर

**ठराव** : यु.जी.सी.मार्फत संशोधन कार्यक्रमासंदर्भात २००९ मधे प्रसिध्द केलेल्या नियमांचा विचार करता सदर शिक्षणक्रम F to F मोडने कार्यान्वित करण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखेत शारिरीक शिक्षण या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती नसल्याने एम.फिल. शारिरीक शिक्षण हा शिक्षणक्रम सध्या स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला बालसंगोपन?

४३.३.२ **विषय क्र बी. – १/ एफ – १७५/ २०१५/ ०२**

**बी.एड. आणि बालसंगोपन व रंजन प्रमाणपत्र शिक्षणक्रम उर्दू भाषेत सुरु करणेबाबत.**

टिप्पणी : Alfalah High School - मुंबई या महाविद्यालयातून बालसंगोपन व रंजन आणि बी.एड. शिक्षणक्रम उर्दू माध्यमातून सुरु करणेबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. ते पत्र सहपत्र क्र.४ म्हणून देण्यात आले आहे. चर्चेसाठी सादर

ठराव : उर्दू बी.एड.शिक्षणक्रम सुरु करावयाचा म्हटला तर एन.सी.टी.ई.ची मान्यता घेणे आवश्यक आहे. तेव्हा सदर संस्थांनी एन.सी.टी.ई. दिल्ली यांचेकडेच त्यांची मागणी करणेबाबत त्यांना कळवावे. आणि बालसंगोपनासाठी किती विद्यार्थी आहेत याची चौकशी करावी त्यानंतर विचार कसा येईल असे कळवावे. असा निर्णय घेण्यात आला.

४३.३.३ **विषय क्र.बी – १/एफ – १७५/ २०१५/०३**

बी.एड.शिक्षणक्रमासंदर्भात......

१) **बी.एड.शिक्षणक्रमाच्या पूरक साहित्यातील अध्यापन पध्दती व अध्यापन प्रतिमाने मालिकांचे व्हेटींग करणेबाबत...**

**टिपणी** : बी.एड.शिक्षणक्रमासाठी डॉ.ए.एन.जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यपन पध्दती नऊ पुस्तकांची मालिका तसेच अध्यापन प्रतिमाने सात पुस्तकांची मालिका विकसीत केली आहे. सदर पुस्तके आजही उपयुक्त आहेत परंतु ती विकसीत होऊन ७-८ वर्षे झाली असल्याने त्यांचे व्हेटींग करणे आवश्यक वाटते. कारण ते साहित्य बी.एड.शिक्षणक्रमास कायम स्वरुपी उपयुक्त ठरणारे आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**ठराव** : सदर साहित्य उपयुक्त असल्याने तसेच त्या साहित्याची शैक्षणिक वैशिष्टे पाहता त्या साहित्याचे व्हेटींग डॉ.जोशी ए.एन. माजी संचालक यांचेकडून करण्यास मान्यता देण्यात आली.

२)**बी.एड.शिक्षणक्रमाची नविन एन.सी.टी.ई मार्गदर्शक तत्त्वानुसार पुर्नरचना करणेबाबत...**

**टिपणी** : बी.एड. शिक्षणक्रमात NCTE च्या नविन अभ्यासक्रम चौकटीनुसार पुर्नरचनेचे कार्य सुरु करण्याचा विचार आहे. ती पुर्नरचित चौकट परिशिष्ट ५ मधे जोडली आहे.

**ठराव :** पर्यावरण शिक्षण हा क्रेडीट बेस शिक्षणक्रम द्वितीय वर्षात समाविष्ट करावा या सूचनेसह सदर सहपत्र क्र.५ मधील बी.एड. शिक्षणक्रम नविन संरचनेस मान्यता देण्यात आली.

**३) बी.एड.शिक्षणक्रमात पर्यावरण शिक्षण हा विषय समाविष्ट करणेबाबत**

**टिपणी :** यु.जी.सी.नियमांचे पालन करुन त्यांनी दिलेल्या अभ्यासक्रम आहे. तसाच विचारात घेऊन या विषयाचा समावेश बी.एड. शिक्षणक्रमात पुढील प्रमाणे करण्या संदर्भात चर्चा निर्णयास्तव सादर.

> यु.जी.सी.च्या शिफारशीनुसार पर्यावरण शिक्षण हया अभ्यासक्रमाचा समावेश बी.एड. शिक्षणक्रमात २०१५-१७ हया तुकडीपासून करण्यात येईल. सदर अभ्यासक्रमाची संरचना पुढील प्रमाणे असेल.
>
> १. अभ्यासक्रम एकून ४ श्रेयांकाचा credit असेल.
> २. अभ्यासक्रम हा संपूर्णपणे यु.जी.सी.प्रमाणे असेल.
> ३. मुल्यमापन
>
> १०० गुण एकूण
>
> - २५ गुण (स्वाध्याय)
> - ५० गुण परिक्षा(online) (अंतिम परिक्षा)
> - २५ गुण क्षेत्रीय प्रात्यक्षिक कार्य (field project work)
>
> ४. अंतिम निकाल श्रेणी पध्दतीने (grade) दिले जाईल.

**ठरावः** सदर विषय बी.एड.शिक्षणक्रमाच्या नविन संरचनेत द्वितीय वर्षात क्रेडीट बेस विषय म्हणून समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**१) बी.एड.शिक्षणक्रमास केवळ प्राथमिक शिक्षकांना प्रवेश देणेबाबत...**

**टिपणी :** एन.सी.टी.ई. गॅझेट मधे दूरस्था शिक्षणद्वारे बी.एड.संदर्भात प्रसिध्द झालेल्या नियमांनुसार य.च.म.मुक्त विद्यापीठाच्या बी.एड.प्रवेश अर्हता

अ) डी.एड. F to F मोडने पूर्ण केलेले आणि किमान दोन वर्षांचा अनुभव असणारे सेवांतर्गत प्राथमिक शिक्षक

ब) पदवी स्तरावर खुला प्रवर्ग ५०% आणि राखीव ४५% गुण

क) शासना नियमानुसार राखीव नियम

**ठराव :-** एन.सी.टी.ई. कडून प्रसिध्द झालेले नियम सर्व संस्थांना बंधनकारक असल्याने उपरोक्त नियमांना मान्यता देण्यात आली.

२) **बी.एड.शिक्षणक्रम सर्व अभ्यासकेंद्रांची डिसेंबर २०१५ अखेरपर्यंत भेटी देऊन त्यांची कार्यवाही व केंद्र मूल्यमापन करणेबाबत...**

**टिपणी :** बी.एड.शिक्षणक्रमच्या अभ्यासक्रे द्रांची पहाणी ब-याच वर्षात झालेली नाही. गुणवत्ता व केंद्र नियंत्रणाच्या दृष्टीने या भेटी घेणे आवश्यक वाटतात. डिसेंबर २०१५ पर्यंत सर्व बी.एड.अभ्यासकेंद्र पाहणी करण्याचा विचार आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर

ठरावः बी.एड.शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रांना वर्षातून किमान एकदा भेटी देणे एन.सी.टी.ई. नियमानुसार अनिवार्य आहे. याचा विचार करता तसेच बी.एड.केंद्रांची गुणवत्ता राखणे, केंद्र आणि विद्यार्थी मैत्री सेतू घट्ट करणे याचा विचार करुन उपरोक्त निर्णयास मान्यता देण्यात आली.

३) **बी.एड. प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजीबाबत...**

**टिपणी :** सर्वच प्राथ शिक्षकांना इंग्रजी विषयाचे अध्यापन करावे लागते. याचा विचार करुन या शिक्षणक्रमासाठी प्राथ.शिक्षकांसाठी इंग्रजी हा वैकल्पिक विषय विकसन कार्य सुरु आहे. त्या लेखक संपांदकाची नावे पुढील प्रमाणे आहे. चर्चा व मान्यतेसाठी
अ) डॉ.एस.बी.वाळके ब) प्रा.मधुरीता भावसार क) प्रा.चेतना कार्लीकर

**ठराव :** उपरोक्त लेखक संपादकांना मान्यता देण्यात आली.

४) **बी.एड. प्राश्निक मूल्यमापक नावे ...**

**टिपणी :** बी.एड. शिक्षणक्रम २०१३ – १५ तुकडीच्या अंतिम परिक्षेसाठी प्रश्नपत्रिका काढणे व उत्तरपुस्तिकांचे मूल्यमापन या कार्यासाठी प्राश्निक मूल्यमापकांची यादी सहपत्र क्र. ७ मधे देण्यात आली आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर

**ठरावः** बी.एड.शिक्षणक्रमाक्रच्या मे/ आक्टो २०१५ मधे होणा-या अंतिम परिक्षेसाठी सहपत्र – ६ मधील नावांना काही नावे नव्याने समाविष्ट करुन मॅान्यता देण्यात आली.

**४३.३.४. विषय क्र बी -१/एफ – १७५/ २०१५/०८**
**विशेष बी.एड.संदर्भात –**

१) **विशेष बी.एड.शिक्षणक्रमाच्या अभ्यासक्रमास मान्यता देणेबाबत..(सहपत्र – ७)**

**टिपणी :** य.च.म.मुक्त विद्यापीठ, शिक्षणशास्त्र आणि आर.सी.आय. यांच्यात झालेल्या MOU नुसार शिक्षणशास्त्र विद्याशाखेने विशेष बी.एड.शिक्षणक्रम अभ्यासक्रम तयार केला आहे. तो सहपत्र – ७ मधे जोडला आहे चर्चा मान्यतेसाठी सादर.

**ठराव** : विशेष बी.एड.संदर्भात तयार केलेल्या अभ्यासक्रमात आर.सी.आय ने नव्याने प्रसिध्द केलेल्या अभ्यासक्रमानुसार बदल करण्याच्या अटीवर सहपत्र ७ मधील अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली.

२) **विशेष बी.एड. शिक्षणक्रमाच्या लेखक संपादकांना मान्यता देणेबाबत...**

**टिपणी :** विशेष बी.एड. शिक्षणक्रमाची विषयनिहाय अभ्यासपुस्तके विकसन कार्य विद्याशाखेने हाती घेतले आहे. सदर नावे सहपत्र – ८ मान्यतेस्तव सादर

ठराव : विशेष बी.एड. शिक्षणक्रमासंदर्भात सहपत्र ८ मधे दिलेल्या सर्व लेखक संपादकांना नावांच्या यादीस मान्यता देण्यात आली.

**३)विशेष बी.एड. शिक्षणक्रम संरचनेला मान्यता देणेबाबत...**

**टिपणी :** विशेष बी.एड.शिक्षणक्रम कार्यक्रमाची संपूर्ण कल्पना यावी यासाठी या शिक्षणक्रमाची संरचना तयार केली आहे.ती सहपत्र – ९ मध्ये जोडली आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर

ठराव : विशेष बी.एड. शिक्षणक्रमाच्या सहपत्र ९ मधे दिलेल्या संरचनेस मान्यता देण्यात आली.

**४३.३.५. विशेय क्र बी – १/एफ – १७५/ २०१५/०५**

**बी.एड. (ई.शिक्षण – P – ३६) शिक्षणक्रमाबाबत**

**टिपणी :** बी.एड.(ई- शिक्षण) P – ३६ या शिक्षणक्रमाला एन.सी.टी.ई. ई ची मान्यता मिळत नसल्याने सदर शिक्षणक्रम. डीप्लोमा इन इ एज्युकेशन आणि 'इ लर्निग प्रमाणपत्र शिक्षणक्रम' या नावाने सुरु करण्याचा विद्याशाखेचा विचार आहे. सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर

ठराव : एन.सी.टी.ई.कडे नवोपक्रमा अंतर्गत बी.एड.(ई.शिक्षण) मान्य करण्याबाबतचा फालोअप करावा. तोपर्यंत उपरोक्त नविन नावाने त्याची कार्यवाही करता येईल मात्र तत्पूर्वी या पदवीका व प्रमाणपत्रास किती विद्यार्थी मिळतील याचा सर्व्हे करावा पुरेसे विद्यार्थी असतील तरच सदर शिक्षणक्रम सुरु करावे या सूचनेसह या शिक्षणक्रम बदलास मान्यता देण्यात आली.

**४३.३.६. विषय क्र. बी- १/ एफ-१७५/ २०१५/०६**

**शालेय व्यवस्थापन पदविकेबाबत...**

**१) शालेय व्यवस्थापन पन पदविका शिक्षण मौखिक परिक्षा २०१४ – १५ च्या परीक्षकांना मान्यता देणेबाबत...(सहपत्र – १०)**

ठराव : सदर शिक्षणक्रम मौ.परिक्षेसंदर्भात तयार केलेल्या सहपत्र १० मधील सर्व तज्ज्ञांच्या नावांना आणि काही नावे नव्याने
समाविष्ट करुन मान्यता देण्यात आली.

**२) शालेय व्यवस्था पन पदविका शिक्षणक्रमात १०० गुणांची अंतिम परिक्षा घेणेबाबत...**

**टिपणी :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची गुणवत्ता वाढविण्यासाठी या शिक्षणक्रमाची किमान १०० गुणांची लेखी परीक्षा घ्यावी असे वाटते. त्यासाठी आवश्यक तज्ज्ञ यादी सहपत्र क्र. १० चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :** सहपत्र १० मधे दिलेल्या अंतिम परिक्षा योजनेस मान्यता देण्यात आली.

**३) शालेय व्यवस्था पन पदविका अभ्यासकेंद्रावरील रेर्काड जतन करणेबाबत......**

**टिपणी :** शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रेंद्रावरील अध्ययनार्थी रेकॉर्ड किती कालावधीसाठी जतन करावे असा प्रश्न केंद्रांकडून सातत्याने विचारला जातो. त्यासंदर्भात चर्चा व निर्णयास्तव सादर.

ठराव : शा.व्य.पदविका शिक्षणक्रमाचा कालावधी किमान १ वर्षे कमाल ३ वर्षे आहे. तेव्हा सदर रेकॉर्ड तीन वर्षे केंद्राने जतन करावे. शक्य असल्यास केंद्रावर थेसिसची सॉफ्ट कॉपी घेऊन सॉफ्ट स्वरुपातच ती जतन करावी असे सूचीत करण्यात आले.

**४३.३.७. विषय क्र. बी.१/एफ – १७५/ २०१५/०७**

**बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम प्रमाणपत्र शिक्षणक्रमाबाबत...**

टिपणी : बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या मे व ऑक्टो- २०१५ मधे होणा-या अंतिम परीक्षेसाठी आवश्यक तज्ज्ञ यादी सहपत्र - १२ चर्चा व मान्यतेसाठी सादर

ठराव : बालसंगोपन व रंजन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाबाबत सहपत्र – ११ यादीस मान्यता देण्यात आली.

**४३.३.८. विषय क्र.बी – १/ एफ – १७५/ २०१५/०८**

**प्रगत अध्यापन शास्त्रतील पदव्यूत्तर पदविका शिक्षणक्रम बंद करणेबाबत...**

**टिपणी** : प्रगत अध्यापन शास्त्रातील पदव्युत्तर पदविका शिक्षणक्रमाला गेल्या तीन वर्षापासून एकही विद्यार्थी प्रवेशित झालेला नाही. याचा विचार करता सदर शिक्षणक्रम बंद करावा असे वाटते चर्चा व मान्यतेसाठी सादर.

ठराव प्रगत अध्यापन शास्त्रातील पदव्युत्तर पदविका शिक्षणक्रमासाठी एकही विद्यार्थी प्रवेशात न झाल्याने सदर शिक्षणक्रम बंद करण्यास मान्यता देण्यात आली.

**४३.३.९. विषय क्र.बी – १/एफ – १७५/ २०१५/०९**

**१) शिक्षणशास्त्र निष्पात (एम.एड) शिक्षणक्रम २०१५ – १७ तुकडी स्थगित ठेवणेबाबत...**

**टिपणी** : एन.सी.टी.ई. कडून File No.51/2014/NCTE/N&S December 23,2014 नुसार सर्व मुक्त विद्यापीठ, दूर शिक्षणसंस्था आणि मुक्त शांळामधील एम.एड.बंद करण्याबाबतचे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यानुसार एम.एड.२०१५ – १७ हया तुकडीचे प्रवेश स्थगित करण्यात आलेले आहेत. सदर शिक्षणक्रम नव्याने सुरु करणेबाबत एन.सी.टी.ई.सोबत पत्रव्यवहार सुरु करण्यात आला आहे.

**ठराव** : एन.सी.टी.ई. निर्णयामुळे एम.एड. शिक्षणक्रम स्थगितीस मान्यता देण्यात आली. मात्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेने एन.सी.टी.ई. कडे पाठ पुरावा करुन लवकरात लवकर सदर शिक्षणक्रम पुन्हा सुरु करण्याची मान्यता मिळवावी असा निर्णय घेण्यात आला.

**२) शिक्षणशास्त्र निष्णात (एम.एड) शिक्षणक्रम प्राश्रिक परिक्षक व समीक्षक यादी मान्यतेबाबत...**

**ठराव** : सदर सहपत्र ३ मधील एम.एड. शिक्षणक्रम प्राश्रिक, मूल्यमापक तज्ज्ञांच्या नावांना मान्यता देण्यात आली.

**४३.३.१०. विषय क्र बी -१/ एफ – १७५/१०**

**शैक्षणिक आणि समाजशास्त्रातील संशोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम प्रपत्र अ,ब सहपत्र – १३ मधे दिले आहे मान्यतेसाठी सादर...**